दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक ४२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१३ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# केगाव-माणकेश्वर किनाऱ्यावर सापडलेल्या स्फोटक सदृश्य कांड्यामुळे घबराट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणच्या केगाव- माणकेश्वर समुद्र किनाऱ्यावर गुरुवारी सकाळीच एकाच वेळी स्फोटक सदृश्य २३ काड्या सापडल्याने नागरिकांस पोलिसांचीही चांगलीच तारांबळ उडाली. तपासणीनंतर आढळून आलेल्या कांड्या जहाजावर सिग्नल फायर फ्लेअर्स म्हणून वापरण्यात येत असल्याचे उघडकीस आले. त्यानंतरच पोलिस आणि नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

काल गुरुवारी सकाळीच केगाव - माणकेश्वर समुद्र किनाऱ्यावर स्फोटकाच्या काड्या आढळून आल्या होत्या. या स्फोटक काड्यांची माहिती नागरिकांनी मोरा सागरी पोलिस ठाण्यात दिल्यानंतर मोरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित मोहिते आणि सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांनी घटनास्थळी धाव घेतली. माणकेश्वर किनाऱ्याची पाहणी करताना स्फोटक सदृश्य काड्या निकामी झालेल्या असल्याचे निदर्शनास आले.

एखाद्या जहाजावरुन टाकून दिलेल्या किंवा पडून समुद्रातून किनाऱ्यावर वाहात आलेल्या असाव्यात अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. समुद्रात प्रवास करताना जहाज बंद पडले अथवा आपत्तीजनक स्थिती निर्माण झाली तर मदतीसाठी जवळून जाणाऱ्या जहाजावरील कर्मचाऱ्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सिग्नल फायर फ्लेअर्स या स्फोटक सदृश्य कांड्या उपयोगात आणल्या जात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान सापडलेल्या काड्या नष्ट करण्यात आल्या असल्याची माहिती मोरा सागरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभिजित मोहिते यांनी दिली आहे.



## तारीख जाहीर करणार नाही मनात येईल त्या दिवशी सिडको कार्यालयात घुसून आंदोलन : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने ३१ मे पर्यंत पाण्याचे योग्य नियोजन करावे अन्यथा तारीख जाहीर करणार नाही मनात येईल तेव्हा सिडकोमध्ये घुसून सिडकोच्या अधिकाऱ्यांना सळो का पळो करून सोडू, असा ईशारा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी कामोठे येथे सिडको प्रशासनाला दिला आहे.

सिडकोने वसविलेल्या कामोठेमध्येही गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. येथील नागरिकांना अनियोजित पाणीपुरवठ्याचा त्रास होत असल्याच्या अनेक तक्रारी सिडको कार्यालयात करण्यात आल्या आहेत. प्यायला पाणी नसतानाही सिडको मात्र नवीन प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र देत सुटली आहे. पाण्याचे योग्य नियोजन सिडको करीत नाही त्यामुळे या अन्यायाविरोधात कामोठे भाजपच्यावतीने सातत्याने सिडकोकडे पाठपुरावा करण्यात आले असून अनियमित पाणी पुरवठ्याबाबत भारतीय जनता पक्षातर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कोमोठे येथे आज (दि. १२) आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात उपमहापौर सीता पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, कामोठे मंडल अध्यक्ष रविंद्र जोशी, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, दिलीप पाटील, विजय चिपळेकर, विकास घरत, नगरसेविका अरुणा भगत, हेमलता गोवारी, कुसुम म्हात्रे, पुष्पा कुत्तरवडे, संतोषी तुपे, राजेश गायकर, राजेश म्हात्रे, महिला मोर्चाच्या कामोठे अध्यक्षा वनिता पाटील, ॲड. आशा भगत, विद्या तामखेडे, दिगंबर कुलकर्णी, हर्षवर्धन पाटील, हॅप्पी सिंग, शरद जगताप, जय पावणेकर, विनोद खेडेकर, नाना मगदूम, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

लोकसंख्या वाढत गेली तसे पाण्याचे प्रमाण कमी झाले. तरीसुद्धा सिडको या संदर्भात नियोजन केले नाही, त्यामुळे अनियमित पाणी पुरवठा नित्याचे झाले, या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोकडे पाठपुरावा भाजपच्यावतीने करण्यात आला. मात्र सिडको नवनवीन

.../२

## सुधागडमध्ये बोटोलिझमचा प्रादुर्भाव ; 30 ते 35 जनावरे दगावली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात बोटोलिझम (हळव्या) या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. मागील २ महिन्यात सुधागड तालुक्यातील नांदगाव पंचक्रोशीतील दिघेवाडी व अन्य गावातील ३० ते ३५ जनावरे या आजाराने दगावल्याची शक्यता आहे. दुभती व कामाची जनावरे मेल्याने शेतकरी व पशु पालकांचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.

उन्हाळ्यात जनावरांना चरण्यासाठी चारा नसतो म्हणून जनावरे मेलेल्या गुरांची हाडे चघळल्याने हा रोग होतो. या रोगाचे प्रमाण मोकाट गुरांमध्ये जास्त दिसते. हा रोग संसर्गजन्य असून लागण झालेले एक गुर दुसऱ्या गावात जाऊन दुसऱ्या



गुरांना देखील संक्रमित करू शकतो. या रोगामुळे अनेकांच्या दुभत्या गायी, म्हशी, बैल आदी मुकी जनावरे मृत्युमुखी पडले आहेत. या रोगावर अद्याप शासनाने लस उपलब्ध केली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. लवकरच या रोगावर शासनाने लस उपलब्ध करावी अशी मागणी पशुपालकांमधुन होत आहे.

जनावर मागील बाजूने मकुवत होणे, पाय आखडुन खाली बसणे, मान टाकणे, शेपुट न हालवणे व बसल्यानंतर न उठणे ही लक्षणे या रोगाची आहेत. दर सहा महिन्यांनी गुरांना लसीकरण करण्यात यावे याकरिता प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र पाठवण्यात येत असते. त्या पत्राची दखल घेऊन ग्रामपंचायतीने गावातील गुरांना लसीकरण करावे या करिता जनजागृती करावयाची असते. मात्र याकडे ग्रामपंचायती देखील दुर्लक्ष करतांना दिसत आहेत. परिणामी गावातील गुरांना रोग प्रतिबंधक लस टोचली जात नाही. आणि याचमुळे गुरे दगावण्याचे प्रमाण वाढले आहे.

.../२

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भुसंपादनाच्या मोजणीला शेतकऱ्यांचा विरोध



**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पेण तालुक्यातील डोळवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव - गडब, डोलवी, वडखळ बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट, या गावातील जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असुन कोलवे या ठिकाणी शेतक-यांनी एकत्र जमुन या मोजणीला विरोध केला. या वेळी रायगड जिल्हापरिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पेण पंचायत समिती सदस्य प्रदिप म्हात्रे, निलेश म्हात्रे, विजय पाटील, सुशील कोठेकर राजू पाटील, महेश पाटील, महेंद्र कोठेकर, गजानन पेढवी, प्रवीण म्हात्रे, प्रभाकर पाटील आदीसह शेतकरी, महिला, शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

या प्रकल्पातील

.../२

## संक्षिप्त...

### सावित्री नदीतील गाळ काढण्यासाठी प्रस्ताव सादर करावा : आदित्य ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रायगड जिल्ह्यातील सावित्री नदीतील गाळ काढण्यासाठी सीआरझेडची परवानगी आवश्यक आहे. यासाठी बाणकोट खाडी परिसरातील नौकानयन सुलभ होण्याच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीकडे सुधारित प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिले.

सावित्री नदीच्या मान्सूनपूर्व तयारीचा श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा घेण्यात आला. यावेळी पर्यटन राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, स्थानिक आमदार भरत गोगावले, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, जलसंपदा विभागाचे विशेष कार्य अधिकारी श्री. गौतम, पूर नियंत्रण समिती रायगड चे सदस्य आदी उपस्थित होते. तर जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. महाड जवळ बाणकोट खाडीत नौकानयन सुलभ होण्यासाठी मेरीटाईम बोर्ड आणि राजेवाडी ते केंबुर्ली या भागात सावित्री नदीतील गाळ आणि बेटे काढण्यासाठी जलसंपदा विभागाने स्वतंत्र प्रस्ताव सादर केले होते. यातील मेरीटाईम बोर्डाच्या प्रस्तावास महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीमार्फत मान्यता देण्यात आली आहे. जलसंपदा विभागाने सीआरझेड मधील तरतुदींनुसार मेरीटाईम बोर्ड मार्फत सुधारित प्रस्ताव सादर केल्यास त्यास मान्यता देता येईल, याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## भिसे खिंडीतील डोंगर उतारावरील झाडे कोसळण्याची भिती

### झाडांच्या मुळांशी जेमतेम राहिला मातीचा आधार

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे व नागोठणे या दोन शहरांना जोडणाऱ्या भिसे खिंडीतील रस्त्या लगत असणाऱ्या डोंगर उतारावरील झाडांच्या मुळांशी जेमतेम मातीचा आधार राहिल्याने पावसाळ्यात कधीही ही झाडे कोसळून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाळ्यात येथून प्रवास करताना अपघाताचा धोका वाढला आहे.



रोहे व नागोठणे या दोन शहरांना जोडण्याबरोबरच नागोठणे कडून अलिबाग व मुरूड तर रोह्याकडून पाली, खोपोली व पेण, पनवेल कडे जाण्यासाठी मध्यम व सोईचा मार्ग म्हणून भिसे खिंडीतील मार्ग प्रचलित आहे. त्यामुळे या मार्गावर रात्रंदिवस मोठी वर्दळ आढळून येते. अगोदरच हा मार्ग म्हणजे अरूंद रस्ता,वेडीवाकडी वळणे यामुळे प्रवास करताना धोकादायकच वाटत आहे. त्यातच सद्य स्थितीत या मार्गावरील रस्त्यालगत असणाऱ्या डोंगरावरील झाडांच्या मुळांशी मातीच नसल्याने कोसळण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पाच तालुक्यांच्या मध्यवर्ती व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत सोईच्या असणाऱ्या या खिंडीतून प्रवास करणे सर्वांनाच परवडत असल्याने इथे कायमच मोठी रहदारी

.../२

## उरल्या सुरल्या आठवणी सोडून पालीचे दगडी प्रवेशद्वार जमीनदोस्त

### रस्ता रुंदीकरणासाठी दगडी प्रवेशद्वार तोडले



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली खोपोली राज्य महामार्गावर पालीच्या सीमेवर उंबरवाडी येथे भव्य दगडी प्रवेशद्वार (कमान) साधारण ५५ वर्षांपूर्वी उभारण्यात आले होते. मागील अनेक वर्षांपासून या कमानीचे अवशेष शिल्लक राहिले होते. मात्र आता पाली खोपोली मार्गाच्या रुंदीकरणासाठी नुकतेच या प्रवेशद्वाराचे (कमानीचे) राहिलेले अवशेष तोडण्यात आले. या प्रवेशद्वारासोबत अनेक आठवणी जोडल्या गेलेल्या असल्याने यावेळी पालीकरांचे डोळे पाणावले.

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली गाव सर्वत्र प्रसिद्ध आहे. या गावच्या सीमेवर पाली-खोपोली राज्य महामार्गावर उंबरवाडी नजीक १९६५-६७ साली शिक्षण महर्षी व रायगड जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब लिमये यांनी पुढाकार घेवुन शासकीय खर्चाने हे भव्य दगडी नक्षीकाम असलेले प्रवेशद्वार (कमान) उभारले होते. त्यानंतर कित्येक वर्षे हे प्रवेशद्वार पालीची शान राखत रुबाबात उभे होते. परंतु नागोठणे येथे जेव्हा आयपीसीएल (सध्याची रिलायन्स) कंपनीची उभारणी सुरू झाली तेव्हा यासाठी लागणारी साधने यंत्रे हि मुंबई-पुणे मार्गे पालीवरुन नेण्यात येऊ लागली. परिणामी या अजस्त्र वाहनांना मोठी यंत्रे घेऊन या प्रवेशद्वारा खालून (कमानी खालुन) जाता येईना त्यामुळे नाईलाजास्तव या प्रवेशद्वाराची (कमान) वरची बाजू

.../२

## कंठवली येथील १२ गुंठे जागेतील बेकायदेशीर बांधकाम अखेर जमीनदोस्त

### सिडकोची मोठी कारवाई : जनसामान्यांत समाधान



**दै.रायगड नगरी । उरण**

सामान्य जनतेला खोटी स्वप्ने दाखवून किसन राठोड या तथाकथित व्यावसायिकाने कंठवली येथे १२ गुंठे जागेत करोडो रुपयांचे बेकायदेशीर बांधकाम करण्यात होते.या बेकायदेशीर साम्राज्यावर काल सिडकोने धडक कारवाई करून ते जमीनदोस्त केले आहे.या धडक कारवाईमुळे संपूर्ण उरण तालुक्यातील जनसामान्यांनी सिडकोच्या कारवाई बाबत समाधान व्यक्त केले आहे.

नवीमुंबईतील अनेक बोगस कंपन्यांचा मालक असणाऱ्या किसन राठोड या व्यक्तीने जमिनीत पैसे गुंतवून पैसे दामदुप्पट करण्याची स्वप्ने दाखवली.त्याच्या फसव्या योजनांना बळी पडून नोकरी व्यवसाय करणाऱ्या सामान्य नागरिकांनी लाखो रुपये त्यात गुंतवले.जनतेचे करोडो रुपये घेवून किसन राठोड यांनी उरण तालुक्यातील कंठवली येथे शेतकऱ्यांना फसवून काही गुंठे जमीन खाडी किनारी विकत घेतली.

त्या जमिनीवर मातीचा भराव करतांना या तथाकथित विकासकाने सी आर झेड कायद्याचे उल्लंघन करीत खाडीमध्ये असणाऱ्या कांदळवनाला गायब करून टाकले.या संदर्भात वनविभागाने या तथाकथित विकासकावर गुन्हा दाखल केला होता.शेतकऱ्यांची शेतजमीन सिडकोच्या नैना प्रकल्पात असतानाही सिडकोची कोणतेही कायदेशीर परवानगी त्याने इमारतीचे बांधकाम करताना घेतली नाही.परिणामः या बेकायदेशीर बांधकामामुळे कंठवली गावातील नागरिकांना पावसाळ्यात पाणी साचू लागल्याने पूर परिस्थितीस सामोरे जाण्याचा त्रास होवू लागला.

या संदर्भात नागरिकांतून अनेक तक्रारी होऊनही किसन राठोड दादागिरीचा वापर करून जनतेचा विरोध दाबून टाकत होता. तहसिलदारांकडे तक्रारी केल्यावर तहसिदारांनी कारवाईचा बडगा उचलल्यावर याने तहसिलदारांना त्याच्या हस्तकांकरवी त्रास देण्याचे ठरविले होते. मात्र सिडकोच्या नैना विभागाने किसन राठोड यांच्या या बेकायदेशीर साम्राज्याचा अभ्यास करून त्याच्यावर आज धडक कारवाई केली.विशेष म्हणजे किसन राठोड यांनी हे बेकायदेशीर बांधकाम त्याच्या स्नेहल या मुलीच्या मालकीचे दाखविले होते.

नव्या मुंबईत स्वतःचे घर घेवू पाहणाऱ्या सामान्य नागरिकांनी

.../२

> सिडकोच्या कार्यक्षेत्रात किसन राठोडच काय कोणीही अशी बेकायदेशीर बांधकामे केली तर त्यांच्यावर कारवाई होणारच. जनतेनेही पैसा गुंतवितात कायदेशीर खात्री करूनच गुंतवणूक करावी. सिडको कायद्याला धरून कारवाई करते. त्यामुळे कोणी कितीही मोठा व्यवसायिक असला तरी त्याची गय केली जाणार नाही.
>
> **प्रताप नलावडे,अधिकारी अतिक्रमण विरोधी पथक, सिडको - नैना**

# बाबा हरदेवसिंहजी यांना समर्पित - समर्पण दिवस

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी यांचा सर्वप्रिय दिव्य स्वभाव व त्यांचे अलौकिक विचार मानव कल्याणार्थ समर्पित होते. त्यांनी पूर्ण समर्पण, सहनशीलता आणि विशालतेच्या भावनांनी युक्त होऊन ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून सत्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहचविला आणि विश्वबंधुत्वाच्या संकल्पनेला वास्तविक रूप प्रदान केले.



संत निरंकारी मिशन दरवर्षी १३ मे हा दिवस 'समर्पण दिवस' म्हणून साजरा करत असते व या दिवशी बाबाजींच्या दिव्य जीवन व शिकवणूकीतून प्रेरणा घेण्यासाठी विशेष संत समागम व सत्संग समारोहांचे आयोजन करते. यावर्षी संत निरंकारी मिशनच्या वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात 'समर्पण दिवस' निमित्ताने एका विशाल निरंकारी संत समागमाचे आयोजन संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ समालखा (हरियाणा) येथे करण्यात आले आहे. याशिवाय संपूर्ण देशात आणि विदेशांमध्ये जागोजागी विशेष सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबई परिसरात ३ ठिकाणी अशा समर्पण दिवस सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये कोपरखैरणे सेक्टर-२३ येथील ज्ञान विकास संस्थेचे विशाल प्रांगण, सुषमा विद्यालय, कामोठे आणि संत निरंकारी सत्संग भवन, हनुमान कोळीवाडा, उरण यांचा समावेश आहे.

हे सर्वविदित आहे, की बाबा हरदेवसिंहजी यांनी ३६ वर्षे सद्गुरु रूपात निरंकारी मिशनची धुरा सांभाळली. आध्यात्मिक जागृतीबरोबरच त्यांनी समाजकल्याणाच्या अनेक कार्यांना निश्चित स्वरूपाची दिशा देऊन गतिमान केले. त्यामध्ये प्रामुख्याने रक्तदान, रक्तपेढीची निर्मिती, नेत्रचिकित्सा शिबिरे, वृक्षारोपण अभियान, स्वच्छता अभियान इत्यादि कल्याणकारी कार्यांचा समावेश आहे. एका आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी महिला सशक्तिकरण तसेच तरुणांच्या ऊर्जेला नवी दिशा व परिमाण देण्यासाठीदेखील बाबाजींनी कित्येक परियोजना कृतीत उतरविण्यासाठी आपले दिव्य मार्गदर्शन आणि आशीर्वाद प्रदान केले. या शिवाय नैसर्गिक आपत्तींच्या वेळी त्यांच्या मार्गदर्शनाखाली मिशनकडून सातत्याने सेवा कार्य करण्यात आले. बाबाजींनी मानवतेचे दिव्य स्वरूप साकार करण्यासाठी निरंकारी संत समागमागमांची अविरत शृंखला पुढे नेली, ज्यामध्ये सर्वांना ज्ञानरुपी धाग्यामध्ये गुंफून प्रेम, नम्रता यांसारख्या दिव्य गुणांनी परिपूर्ण केले. 'मानवता हाच माझा धर्म होय' हे कथन सार्थक करत संत निरंकारी मिशनची शिकवण त्यांनी लहान-सहान वस्त्यांपासून ते विदेशापर्यंत विस्तृतपणे पसरविली. त्यांनी हेच समजावले, की भक्तीचा प्रवाह निरंतर आपल्या जीवनात वाहत राहायला हवा. बाबा हरदेवसिंहजी यांना मानवमात्राच्या सेवेमध्ये आपले उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल देश-विदेशात सम्मानितदेखील करण्यात आले. २७ यूरोपीय देशांच्या संसदेने त्यांना विशेष रूपात सन्मानित केले. त्यांनी मिशनला संयुक्त राष्ट्रांचे (ण.छ.) चे मुख्य सल्लागार बनविले. याबरोबरच जगामध्ये शांती स्थापित करण्याच्या त्यांच्या यशस्वी प्रयत्नांसाठी त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मानित करण्यात आले.

सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज, बाबा हरदेवसिंहजी यांच्या शिकवणूकीचा उल्लेख करताना सांगतात, की बाबाजींनी आपले संपूर्ण जीवन मानवकल्याणासाठी समर्पित केले. ३६ वर्षे मिशनचे नेतृत्व करत त्यांनी प्रत्येक भक्ताला मानवतेची शिकवण देऊन त्यांच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त केला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये सदोदित सर्वशक्तिमान निरंकार प्रभुच्या इच्छेवर विश्वास ठेवण्यावर त्यांनी भर दिला. सद्गुरु माताजी नेहमी सांगतात, की आपण आपल्या आ-चरणातून एक यथार्थ मनुष्य होऊन क्षणोक्षणी समर्पित भावाने आपले जीवन जगावे. हेच बाबाजींच्या प्रती खऱ्या अर्थने आमचे सर्वात मोठे समर्पण असेल आणि त्यांच्या शिकवणूकीवर चालून आपण त्यांना खरी श्रद्धांजली अर्पण करु शकतो. मानव कल्याणाच्या प्रति समर्पित सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज आयुष्यभर आध्यात्मिक मार्गदर्शकाच्या रूपात मानवमात्राला सत्याचा मार्ग दाखवत राहिले. वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज सकारात्मक स्वरूप देत हा दृष्टिकोण नवऊर्जा व तन्मयतेने पुढे घेऊन जात आहेत. वर्तमान काळात सर्वत्र वैर, ईर्षा, द्वेषाचे वातावरण व्याप्त आहे. मनुष्य एकमेकांचे अहित करण्यामध्ये गुंतला आहे. अशा परिस्थितीत बाबा हरदेवसिंहजी यांचे प्रेरणादायक संदेश - 'काहीही बना मुबारक आहे, पण आधी मनुष्य बना'; 'भिंती विरहित जग'; 'एकाला जाणा, एकाला माना, एक व्हा'; जीवनात धारण करण्याची गरज आहे. तेव्हाच जगामध्ये शांतीसुखाचे वातावरण निर्माण होऊ शकेल.

# चिरनेर येथे १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १४/ ५/ २०२२ रोजी उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती व श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील एकमेव उरण तालुक्यात श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.

गेली २ वर्षे कोरोना असल्याने कोणतेही उत्सव सण, जयंत्या, पुण्यतिथी साजरे करता आले नाही. यंदा मात्र सर्व सण उत्साहात साजरे करण्यात येऊ लागले आहेत . श्री छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती यावर्षी मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी केली जाणार आहे. सकाळी ९ वा. श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे इंदुमती कृष्णा नागा कडू यांच्या हस्ते पूजन, सकाळी १० वा. तृप्ती महेश गणेश केणी व रेखा संकेत काळू म्हात्रे यांच्या शुभ हस्ते सत्यनारायनाची महापूजा, दुपारी ३:३० वा. शिवबंधू प्रेमी, समस्त शिवभक्त, ग्रामस्थ मंडळ चिरनेर उरण, प. पु. हभप हसुराम बाबा केळवणे यांचे शिष्य हभप अनिल महाराज (वशेणी ), हभप गनपत महाराज(सावरसई ) व शिष्यगण यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य पालखी मिरवणूक सोहळा, सायंकाळी ७ ते ८ महाप्रसाद, रात्री ९ वा श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर युवा शिव व्याख्याते कु. विवेक परशुराम भोपी(नितळस )यांचे व्याख्यान असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

छावा प्रतिष्ठान चिरनेर, युद्धनौका ग्रुप,ग्रामस्थ मंडळ चिरनेर कातळपाडा, दुर्गा माता नवरात्र उत्सव चिरनेर, नवतरुण मित्र मंडळ कातळपाडा, अध्यात्मिक पौर्णिमा मंडळ चिरनेर भोम,अंकुश इलेव्हन, अर्जुन इलेव्हन, नरेंद्र महाराज सांप्रदाय चिरनेर, अभिनव मित्र मंडळ, निखिल स्पोर्ट्स, मंजित स्पोर्ट्स,छावा ग्रुप,सह्याद्री प्रतिष्ठान, आकृती कलामंच चिरनेर,ओम साई संवाद मंडळ चिरनेर, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था आदी विविध सामाजिक संस्था श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करणार आहेत.

सर्व शिवभक्तांनी पालखी सोहळ्यास उपस्थित राहून छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना द्यावी व दिवसभरातील विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कातकरी उत्थान सप्तसुत्री कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**



जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांचे निर्देशान्वये व उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांचे मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान सप्तसुत्री कार्यक्रम शिबीर चावणे खुटल्याचा पाडा व पेरूवाडी तालुका पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.

शिबिर यशस्वी होणेसाठी आदिवासी प्रकल्प अधिकारी पेन, ग्रामविकास विभाग, वन विभाग, कृषी विभाग, तालुका आरोग्य विभाग, उपजिल्हा रुग्णालय पनवेल, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य विदुत वितरण कंपनी, सेतू केंद्र, महा ई सेवा, आधार कार्ड चालक , इ श्रम कार्ड चालक ,पुरवठा विभाग, संजय गांधी शाखा, ग्रामपंचायत चावणे, उरण सामाजिक संस्था, अर्चना ट्रस्ट, सिपला ट्रस्ट यांनी परिश्रम घेतले.

यावेळी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर, चेतन गायकवाड उपस्थित होते.

# स्नेहकुंज वृद्धाश्रम विकासकामाचे पत्रकार सय्यद अकबर यांच्या हस्ते भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल तालुक्यातील नेरे येथील स्नेहकुंज वृद्धाश्रम विकास कामाचे भूमिपूजन कोकण डायरीचे संपादक, भाजप मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड प्रभारी जेष्ठ पत्रकार सय्यद अकबर यांच्याहस्ते करण्यात आले.

स्नेहकुंज आधार गृह येथे गेली अनेक वर्षे वृद्धाश्रम चालवले जाते. कोरोना कोवीड काळात सदर वृद्धाश्रम चालवणे मोठे जिकरीचे काम होते. परंतु स्नेहकुंजचे नितीन जोशी व संगीता जोशी या सामाजिक जाणीवेतून समर्पित वृत्तीने कार्यरत उभयतांनी जिद्दीने कार्य केले आहे. आता पहिल्या मजल्यावर असलेल्या वृद्धाना तळमजल्यावर येणे जाणे ही वृद्धावस्थेमुळे मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे अत्यावश्यक असलेल्या नव्या कामाची गरज होती. आज त्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

जोशी उभयतांना मी स्नेहकुंजच्या माध्यमातून निरपेक्ष समाजसेवा करतांना पाहतो आहे. समाजात अशा निष्कपट भावनेने कार्य करणाऱ्या लोकांची गरज आहे असे प्रतिपादन सय्यद अकबर यांनी केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडको कार्यालयात घुसून आंदोलन : आ.प्रशांत ठाकूर

प्रकल्पांना पाणी देत असताना त्यांना जुन्या गृहसंकुलांचा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे.

जो पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत होत नाही हे आंदोलन सुरूच ठेवण्याचा ईशारा यावेळी सिडकोला देण्यात आला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले कि, रहिवाशांना मुबलक आणि नियमित पाणी देण्यासाठी सिडकोने नियोजन केले पाहिजे, संबंधितांशी चर्चा करून मार्ग काढला पाहिजे पण तसे अधिकारी करत नाहीत. पण आता ३१ मे पर्यंत योग्य नियोजन न केल्यास शांत बसणार नाही. सिडकोने गृहसंकुल उभारताना डेव्हलपमेंट चार्जेस घेतले आहेत आणि त्या अनुषंगाने पाणी, गटारे, रस्ते व तत्सम सुविधा देण्याचे कर्तव्य सिडकोचे आहे. आंदोलन केले कि तेवढ्या पुरते नियोजन होते आणि नंतर सिडको पुन्हा भोंगळ कारभार करते, हा मनमानी कारभार चालणार नाही आणि हे आंदोलन शेवटचे नाही हे याद राखा असा इशारा सिडकोला त्यांनी दिला. एसीच्या केबिनमध्ये बसून पाण्याशिवाय तडपायला सिडकोचे अधिकारी लावत आहेत, त्यामुळे आता बस्स झाले जे आंदोलन करणार त्याची तारीख जाहीर करणार नाही तर मनात येईल त्या दिवशी सिडको कार्यालयात घुसून आंदोलन करणार आहोत आणि त्यावेळी अधिकाऱ्यांना स्वस्थ बसू देणार नाही, असेही त्यांनी सिडकोला ठणकावून सांगितले.

## सुधागमध्ये बोटोलिझमचा प्रादुर्भाव ; ३० ते ३५ जनावरे दगावली

सुधागड तालुक्याच्या लोकसंख्येनुसार पशुसंवर्धन विभागाकडे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. यामुळे प्रत्येक ठिकाणी हे कर्मचारी पोहचण्यास असमर्थ ठरत आहेत. तरीही तालुक्यात असणारे दोन ते तीन अधिकारी व काही कर्मचारी हे गावोगावी जाऊन गुरांना लसीकरण करत असतात. उन्हाळ्यात गुरांना खाण्याकरिता हिरवा चारा नसल्याने ते उघड्यावरील सडलेले खाद्य खातात. तसेच मेलेली गुरे जमिनीत न पुरता तसेच उघड्यावर टाकले जातात. या मृत गुरांची हाडे इतर गुरे चघळतात. परिणामी हा रोग पसरतो. त्यामुळे पशू पालकांनी मृत जनावरांना जमिनीत गाडावे जेणेकरून हा रोग पसरणार नाही.

## भुसंपदानाच्या मोजणीला शेतकऱ्यांचा विरोध

खारजांभेळा, खारचिर्बी, खारढोंबी या गावातील जमीनी शासनाने भुसंपादनातुन वगळण्याचा निर्णय घेतला असला तरी कोलवे, बेणेघाट, वावे, डोलवी, काराव, खारमांचेळा, खारकारावी या गावातील जमीन या प्रकल्पासाठी संपादीत करण्यात येणार असल्याने या संर्भातील जमीन मोजणी सदर्भातीह नोटीस येथील शेतकऱ्यांना देण्यात आली या नोटीसी शेतकऱ्यांनी स्विकारल्या नाहीत तर कोलवे येथे येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी एकत्र जमुन या मोजणीस विरोध केला ज्या प्रमाणे तिन गावे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला त्याच प्रमाने या प्रकल्पातील सर्व गावे भुसंपादनातुन वगळुन हा प्रकल्पच शासनाने रद्द करावा अशी मागणी शेतक-यांनी केली.

या भुसंपादनामुळे शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधन नष्ट होणार आहे. गावाचा विस्तार करण्यासाठी जागाच शिल्लक राहाणार नाही. तर अनेकांचे छोटे मोठे व्यवसाय या जागेत आसल्याने अनेकांचा रोजगार जाणार आहे त्यामुळे त्यामुळे या भुसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे. हे भुसंपादन रद्द करावे अशा हरकती उपविभागिय अधिकारी कार्यालय पेण येथे शेतक-यांनी नोदविल्या असताना आम्हाला विश्र्वासात न घेता हा प्रकल्प लादला आहे, तर आमदार जयंत पाटील यांनी देखील विधानपरिषदेत या प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे व प्रकल्प रद्द करावा अशी मागणी शासनाकडे केली असल्यामुळे या प्रकल्पाला आमचा विरोध असल्याचे शेतक-यांनी सांगितले.शेतकरी आक्रमक झाले आसल्याने शेतक-यांचा तिव्र विरोध पाहता मोजणीचे अधिकारी कोलवे या ठिकाणी आलेच नाही,

## भिसे खिंडीतील डोंगर उतारावरील झाडे कोसळण्याची भिती

आढळून येते .त्यामुळे रहदारीचा विचार करता प्रवासी वर्ग व वाहनचालक यांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये यासाठी संबंधित विभागाने त्वरित पावसाळा ऋतूस प्रारंभ होण्यापूर्वी धोकादायक ठरणारी झाडे तोडण्याची मोहिम हाती घेणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे संभाव्य धोका टाळता येऊ शकेल.

पाच ते सहा कि.मि.अंतर असणाऱ्या या खिंडिचा बहुतेक भाग घनदाट जंगलातूनच जात असल्याने एका बाजूला पूर्णपणे खोलवर दरी आहे. त्यामुळे वाहनचालकांनाही वाहने चालविताना पुरेशी खबरदारी घेऊनच वाहने चालवावी लागत आहे.अशा परिस्थितीत धोकादायक ठरणाऱ्या झाडामुळे पावसाळ्यात झाडांहच्या मुळाशी जेमतेम असणा-या मातीची धूप होऊन झाडं कोसळून अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधितांनी त्वरीत यावर उपाय योजना करण्याची मागणी प्रवासीवर्ग व वाहनचालक यांच्याकडून केली जाऊ लागली आहे.

## उरल्या सुरल्या आठवणी सोडून पालीचे दगडी प्रवेशद्वार जमीनदोस्त

तोडावी लागली. मात्र आता रुंदीकरणामुळे राहिलेले अवशेष देखील तोडण्यात आले आहेत. परिणामी पालीच्या शिरपेचातील एक मोती निखळला आहे. इतर गावांमध्ये जसे प्रवेशद्वार त्या गावची शोभा वाढवत असते, त्याचप्रमाणे पाली गावसाठी पुन्हा भव्य प्रवेशद्वार उभारण्यात यावे. असे माजी ग्रामपंचायत सदस्य अमित निंबाळकर यांनी सांगितले.

## बांधकाम अखेर जमीनदोस्त

किसन राठोड यांच्या या प्रकल्पात पैसे गुंतविले होते.मात्र हा प्रकल्पच बेकादेशीर ठरून जमीनदोस्त झाल्याने यात गुंतवणूक करणाऱ्या नागरिकांच्या स्वतःच्या घराचे स्वप्न स्वप्नच ठरणार आहे. तर ही कारवाई चोख पार पाडण्यासाठी उरणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील यांच्या अधिपत्याखाली १ पोलिस निरीक्षक ७ पोलिस अधिकारी ४५ पोलिस कर्मचाऱ्यांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.तर सिडकोच्या वतीने ४ पोकलंन यंत्र व सुरक्षा अधिकाऱ्यांसह १२ सुरक्षा रक्षक कारवाईसाठी ठेवण्यात आले होते.

---

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.प्रदीप भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.५६७/२०२२
ने.ता.१३/०६/२०२२

श्री.नागेश गोमा चौधरी
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कानपोली
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील गोमा कमळ्या चौधरी हे दि.०३/०५/१९९० रोजी मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तथापि अनावधनाने मयत गोमा कमळ्या चौधरी यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत गोमा कमळ्या चौधरी यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.११/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **प्र.वर्ग न्याय.पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **प्र.वर्ग न्याय.पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे खालील नमूद असलेल्या मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

**मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत सर्व्हे नं.१२२/०, १२३/२, १२३/५ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या माऊंटन व्ह्यू अपार्टमेंट या इमारतीमधील के विंग मधील पहिल्या मजल्यावरील समारे ७६० चौ.फूट (७०.६३) चौ.मी. बांधीव क्षेत्रफळाची सदनिका क्र.१०१ या श्री.अनिल भिका पाटील यांच्या मिळकतीबाबत.**

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कांसंबंधात हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.१२/०५/२०२२

**सही/-**
**अ‍ॅड.सागर का. कोंडीलकर**
**अ‍ॅडव्होकेट हायकोर्ट**
**ऑफिस : शॉप नं.२१, पहिला मजला**
**नगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल,**
**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

---

ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे
मे.मुजावर यांचे न्यायालयात
अ‍ॅड.दिनानाथ के.सोनकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
स्पे.मु.क्र.२७७/२००९
नि.नं.८६/ड
ने.ता.२०/०६/२०२२

श्री.सुरजितसिंग संतासिंग कोहली — वादी
विरुद्ध
मे.पसिफिक फ्रोझेन फॅसिलीटी प्रा.लि.
तर्फे डायरेक्टर श्री.महावीर हिम्मतलाल कोठारी — प्रतिवादी क्र.१६

१) श्री.सुरजितसिंग संतासिंग कोहली, धंदा : व्यवसाय, राहणार : फ्लॅट नं.७६ झंजार को.ऑप.हौसिंग सोसायटी, मिडल क्लास हौसिंग सोसायटी, पनवेल, जिल्हा : रायगड, २) मे.पसिफिक फ्रोझेन फॅसिलीटीज प्रा.लि.तर्फे डायरेक्टर श्री.महावीर हिम्मतलाल कोठारी, सज्ञान, व्यावसायिक राहणार : बी-७०३, गोविंद टॉवर, एस.जी.कॉम्प्लेक्स, सेक्टर १७, वाशी नवी मुंबई, जिल्हा : ठाणे

वादी श्री.सुरजितसिंग संतासिंग कोहली व इतर यांनी तुमच्या विरुद्ध दावा, खरेदीखत दस्त रद्द करण्याकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात दिवाणी दावा हा दावा दाखल केला आहे. सदर दाव्याकामी मे.कोर्टाच्या आदेशानुसार तुम्हास बेलिफामार्फत दाव्याकामी हजर राहण्यासाठी प्रतिवादी क्र.१६ यांना सदर दाव्यातील तुमच्या पत्यावर दोन वेळा समन्स व नोटीसची पाठविण्यात आली आहे. परंतु सदर जागेवर सध्या तुम्ही राहत नाही व आता कुठे राहत आहेत हे मााहित नाही असे बेलिफ रिपोर्ट वरुन दिसत आहे.

तरी तुम्हास कळविण्यात येत आहे की, तुम्हास सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१६ म्हणून तुम्हाला पक्षकार करण्यात आले आहे. सदर दाव्याविरुद्ध तुम्हाला तुमचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याकरिता दि.२०/०६/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात हजर होवून दाव्याची सुनावणी पुढे सुरू होण्यासाठी या वादीस मदत करावी. तुम्ही तसे न केल्यास व तुमच्या विरुद्ध पुढील कारवाई करण्यात येईल.

आज दि.२९/०४/२०२२ माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.पांडे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.नरेश टी. म्हसकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.नं.५७१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१४/०६/२०२२

श्रीमती.रिहाना फारुक शेख
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.अे/१०१, मरी आई कॉम्प्लेक्स सीएचएस लि.,
स.नं.१, हि.नं.७ ब, कोप्रोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत चिपळे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती.रिहाना फारुक शेख, रा.रुम नं.अे/१०१, मरी आई कॉम्प्लेक्स सीएचएस लि., स.नं.१, हि.नं.७ ब, कोप्रोली, ता.पनवेल, जि.रायगड यांची मुलगी कु.अलिना फारुख शेख हिचा जन्म दि.०४/०९/२०१४ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : कोप्रोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे आणि अर्जदार यांनी त्यांची मुलगी कु.अलिना फारुख शेख हिचे जन्माची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांची मुलगी कु.अलिना फारुख शेख ही वर नमूद ठिकाणी जन्मलेली आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१२/०५/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोलाड येथे अखंड नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कोलाड विभाग वारकरी संप्रदायाचे वतीने दि.१४ व १५ मे रोजी अखंड नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन सुएसोच्या द.ग.तटकरे माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय कोलाडच्या भव्य प्रांगणावर करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

या सप्ताह सोहळ्यात पहाटे ४ ते ६ काकडआरती,सकाळी ७ ते ८ सर्व मंगलनिधी,दु.९ ते १२ श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण तद्नंतर महाप्रसाद,सायं.५ ते ६:३० वा.सामुदायिक हरिपाठ,६:४५ ते ९ वा.हरिकिर्तनरूपी सेवा,व रात्रौ.११ वा.हरिजागर आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. तर शनि.दि.१४ रोजी ह.भ.प.संजय महाराज वेळूकर यांची हरिकिर्तनरूपी सेवा व रवि. दि.१५ रोजी स.१० ते १२ ह.भ.प.अशोक महाराज जाधव पुणे यांचे काल्याचे किर्तनसेवा व सांगता आरती आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या सप्ताह सोहळ्यास रोहे तालुका वारकरी सांप्रदायाचे विशेष सहकार्य लाभणार असून त्यांच्याच सहकार्याने कोलाड विभाग वारकरी सांप्रदायाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच सप्ताह सोहळ्याचे कमिटी पदाधिकारी मोलाचे सहकार्य करीत आहेत.

## श्री सत्यनारायणाच्या महापूजेनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मोंडकर देवघर, मोंड चिंचवाडी ता.देवगड जि सिंधुदुर्ग येथे दि.१३ मे रोजी ४५ व्या वर्षात पदार्पण करीत यंदाही श्री सत्यनारायणाच्या महापूजेनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.त्यास सर्वांनी उपस्थिती दर्शवून मोंडकर बंधू ,मोंडकर सामाजिक संस्थेस उपकृत करावे असे आवाहन या संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री सत्यनारायणाची महापूजा शुक्रवार दिनांक १३ मे २०२२ रोजी सकाळी १०.०० वा मोंडकर देवघर, मोंड चिंचवाडी ता.देवगड जि सिंधुदुर्ग येथे आयोजित केली आहे.यावेळी अध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, क्रिडा, आणि विकास हे कार्यक्रमाचे स्वरूप असणार आहे. कार्यक्रम सकाळी ०८:००:-देवक स्थापना व प्राण प्रतिष्ठा सोहळा' सकाळी १०:०० :- श्री सत्यनारायणाची महापूजा दुपारी ०१.३०:- महाप्रसाद सायं ०४:३० :- लहान मुलांचे विविध स्पर्धा सायं ०६:००:-हळदी-कुंकू समारंभ रात्रौ ०७:३०:- रेकॉर्ड डान्स रात्रौ ०९.००:- मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व बक्षिस वितरण समारंभ, सेवानिवृत्त सभासदांचा जाहिर सत्कार डॉक्टर शरिफ गिरकर यांचा जाहिर सत्कार रात्रौ १०.००;- सुस्वर भजनांचा डबलबारी सामना गुरुवर्य कै चिंतामणी पांचाळ बुवा यांचे शिष्य बुवा: श्री स्वप्नील मेस्त्री(दिवा-ठाणे) गुरुवर्य कै. काशिराम परब बुवा व श्री सुशिल गोठणकर बुवा यांचे शिष्य बुवा:- श्री समीर कदम(कुडाळ) यांचा बहारदार सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी सर्वांनी या अभूतपूर्व कार्यक्रमास आपली उपस्थिती लावावी असे श्री विलास सि मोंडकर(अध्यक्ष) श्री हरिश्चंद्र म मोंडकर(सचिव) श्री सुरेश ग मोंडकर(खजिनदार) यांनी सांगितले आहे.अधिक माहिती साठी संपर्क करा:९१६७०८९०३६/९८६९९९४५४४

दैनिक रायगड नगरी जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

मा.गोडसे सो

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५३१/२०१४
नि.नं.२४/ड
ने.ता.०९/०६/२०२२

१) श्रीमती.बदरुन्नीसा खुर्शीद अहमद
वय : ७८, व्यवसाय : काही नाही
२) श्रीमती.रशीदा खातून, वय : ५४, व्यवसाय : काही नाही
३) श्रीमती.साजिदा सयद, वय : ५१, व्यवसाय : काही नाही
४) श्रीमती.आबिदा सयद, वय : ४८, व्यवसाय : काही नाही
अर्जदार क्र.१ व ३ ते ४ राहणार : बी/१४/७, दुसरा मजला,
केंद्रीय विहार, सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई
अर्जदार क्र.२ रा.०३ ई, कावेरी सोसायटी, सेक्टर ५,
खारघर, नवी मुंबई अर्जदार

सदरहू अर्जदार क्र.१ चे पती व २ ते ४ चे वडील मरहुम खुर्शीद अहमद ह्यांचे दि.१०/०५/२०१३ रोजी निधन झालेले आहे. सब सदरहू मयत व्यक्तींच्या पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

सदरहू अर्जदार क्र.१ चे पती व २ ते ४ चे वडील मरहुम खुर्शीद अहमद ह्यांचे मालकीची खालील वर्णनाची मिळकत आहे. सबब मयत मरहुम खुर्शीद अहमद ह्यांचे कायदेशीर वारसांची नावे सदर मिळकतीस नांदणे आवश्यक आहे. सबब सदरहू अर्जदार यांनी खाली निर्देशित केलेल्या मिळकती संदर्भात कायदेशीर वारस म्हणून नाव नोंदणी करिता वारसदाखला मिळणे करिता पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) सदनिका क्र.बी/१४/७, दुसरा मजला,
केंद्रीय विहार सोसायटी, सेक्टर-११, खारघर, नवी मुंबई
२) गाळा क्र.८, तळमजला, विशणु विहार को.ऑप.सोसायटी,
सेक्टर-४, बेलपाडा, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाची ही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ही नोटीस आज दि.१२/०५/२०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून नावडे फाटा येथे उड्डाणपूल; नावडे फाटा पूल वाहतुकीसाठी खुला

**दै.रायगड नगरी । पनवेल**



तळोजा औद्योगिक क्षेत्रात जाण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून नावडे फाटा येथे उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून येथील युवकांनी हा पूल वाहतुकीसाठी खुला केला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नातून हा पूल मार्गस्त झाला आहे.

पनवेल-मुंब्रा मार्गावर अवजड वाहनांची नेहमी वर्दळ असते. त्यात नावडे फाटा येथून तळोजा औद्योगिक क्षेत्रात जाण्यासाठी एकमेव मार्ग असल्यामुळे नावडे फाट्यावर नेहमी वाहतूककोंडी होते. त्यामुळे तीन वर्षांपूर्वी ७० कोटी रुपये खर्च करून एमएसआरडीसीने नावडे फाटा येथे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू केले. दोन वर्षात काम पूर्ण करून पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचा संकल्प करण्यात आला होता. मात्र कोरोनामुळे लागू करण्यात आलेली टाळेबंदी आणि नावडे ग्रामस्थांना गावातून बाहेर पडण्यासाठी भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात यावे, यासाठी ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनामुळे काही दिवस उड्डाणपुलाचे काम बंद होते. अखेर नावडे गावालगत पादचारी भुयारी मार्ग उभारण्याचा निर्णय घेवून सुरु झालेले उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या पूलासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. मात्र पूल पूर्ण होऊनही वाहतुकीसाठी संबंधित प्रशासन खुला करून देत नव्हते, त्यामुळे नावडे विभागातील भाजपचे युवा नेते दिनेश खानावकर, प्रशांत खानावकर, नावडे फेज २ अध्यक्ष मदन खानावकर, नावडे गाव अध्यक्ष भूपेश खानावकर, विशाल खानावकर, नितेश खानावकर, विजय खानावकर, महेश म्हात्रे आदी तरुणांनी बुधवारी रात्री उदघाटन करून सदर पूल वाहतुकीसाठी खुला करून दिला आहे.

# कार भाड्याचे मोठ्या रकमेचे आमिष दाखवून केलेली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कारच्या भाड्याचे मोठ्या रकमेचे आमिष दाखवून गाड्यांचे भाडे न देता व गाडी परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार नवीन पनवेल येथे उघडकीस आला आहे. आरोपी इब्राहिम इप-तेखार कोंडकरी (राहणार- नेरूळ) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवीन पनवेल सेक्टर ३ येथे राहणारे महेश दादासो घनवट यांचा टूर्स अँड ट्रॅव्हल्स व्यवसाय आहे. त्यांनी दोन गाड्या व्यवसाय करता विकत घेतल्या होत्या. २०१९ मध्ये त्यांची ओळख इब्राहिम कोंडकरी यांच्याशी झाले. त्याने स्वतःचे नायब रेंट कार टूर्स अँड ट्रॅव्हल्स करता गाड्या भाड्याने घेत असल्याने सेक्टर ६, गुरुद्वारा समोर, नवीन पनवेल ब्रिज खाली वाहन पार्किंग येथे गाड्या भाड्याने देणे बाबत त्यांनी बोलणी गेली. यावेळी इब्राहीम याने कारचे भाड्याच्या मोठ्या रकमेच्या आमिष दाखवले. महेश याने त्याच्यावर विश्वास ठेवून इनोवा कंपनीची कार आणि होंडा मोबिलो कार प्रतिमहिना भाडेतत्त्वावर इब्राहिमला दिली. ते भाडे रोख व बँक स्वरूपात देत होते.

यावेळी रुपेश वसंत घुले आणि योगेश भारत अंकुश यांच्या कार देखील इब्राहिम याला भाड्याने देण्यात आल्या. काही दिवसांनी गाड्यांच्या भाड्याचे पैसे न दिल्याने इब्राहीम यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. व गाड्या परत मागितल्या असता गाडीला असणारे जीपीएस सिस्टिम त्याने बंद करून टाकले व गाड्या परत दिल्या नाहीत. ४ लाख रुपये किंमतीची इनोव्हा कार, ६ लाख रुपयांची होंडा कंपनीची मोबीलियो कार, ५ लाख रुपये किंमतीची रुपेश उले यांची इनोव्हा कार, ३ लाख २० हजार रुपये किमतीची योगेश भारत अंकुश यांची स्विफ्ट कार अशा १८ लाख वीस हजार रुपये किमतीच्या गाड्या भाड्याने घेऊन इब्राहीम याने फसवणूक केली.

# पैशांचे पाकिट परत करुन काशिराम कोतवाल यांनी दाखविला प्रामाणिकपणा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील पाटणसई गावातील ग्रामस्थ काशिराम टोळू कोतवाल यांना वाकण नाक्यावर सापडलेले पैशांचे पाकीट त्यांनी पाटणसई ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच पांडुरंगशेठ गायकर यांच्या मदतीने मालकास परत करून आजच्या जगात देखील प्रामाणिक माणसे असल्याचे दाखवुन दिले आहे. काशिराम कोतवाल यांनी दाखवलेला प्रामाणिकपणामुळे त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार वाकणनाका येथील हॉटेल समाधान येथुन आपल्या पाटणसई येथील घरी चालत जात असताना काशिराम कोतवाल यांना रस्त्यावर पैशांचे पाकीट सापडले. त्यानंतर त्यांनी पाटणसई ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच पांडुरंगशेठ गायकर यांच्याशी संपर्क साधुन त्यांना पाकीट दाखविले.

त्या पाकिटात एटीम कार्ड, मोटार लायसन्स व ३ हजार ५०० रुपये रोख रक्कम होती. त्यानंतर पांडुरंगशेठ गायकर यांनी वाकण नाक्यावर कर्तव्यास असलेले पोलिस नाईक मनोहर माळी यांची भेट घेऊन ते पाकीट त्यांच्याकडे सुपूर्द केले.

नंतर मनोहर माळी यांनी मोटार लायसन्सच्या आधारे कांदळेपाडा (वाशी) तालुका पेण येथील व्यावसायिक राजेंद्र पाटील यांच्याशी संपर्क साधला व त्यांना त्यांचे पैशांचे पाकीट परत केले. यावेळी राजेंद्र पाटील यांनी काशीराम कोतवाल यांचे आभार मानले.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : केवाळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिल योगेश जोमा माळी, रा.केवाळे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : केवाळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| केवाळे | गणा बळीराम गायकर<br>नाना बळीराम गायकर<br>हरी बळीराम गायकर<br>बाजीराव बळीराम गायकर<br>वंदना माया शेळके<br>मिलींद दामू गायकर<br>जयाबाई दामू गायकर<br>वंदना शिवदास पाटील<br>रंगनाथ वसंत म्हात्रे<br>निता चंद्रकांत घरत<br>मिननाथ वसंत म्हात्रे | ५९/१/क | भोग वर्ग १ | ०-४४-०० पैकी<br>०-२१-५०<br>विक्री क्षेत्र<br>०-१७-५० | ७.१२<br>३.४८ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०५/२०२२

**सही/-
ॲड.सतिश स. फडके
(ॲडव्होकेट-हायकोर्ट)**

**पत्ता : ऑफिस नं.बी-२, प्लॉट नं.१०४, धवलगिरी को.ऑ.हौ.सो., पिसपार्क हॉटेलजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६, मो.नं.८८९८२१७५५५**

# ठाणाळे येथील ३५ वर्षीय तरुणाची झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील ठाणाळे येथील एका ३५ वर्षीय तरुणाने बुधवारी आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पाली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुधागड तालुक्यातील ठाणाळे येथील संदीप विठ्ठल फाटे (वय ३५) हा तरुण मंगळवारी (ता.१०) मी शेतात जाऊन फेरी मारून येतो असे घरी सांगून गेला, तो रात्री परत आला नाही. म्हणून त्याचा गावात व आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला असता तो तेथेही मिळून आला नाही. बुधवारी (ता.११) सकाळी ६ वाजल्याचे सुमारास गावातील व्यक्तीस एका शेताजवळील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत संदीपचा मृतदेह आढळून आला. या घटनेची पाली पोलीस स्थानकात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षार्थी पोलीस उपनिरीक्षक एल.एन. सरगर हे करीत आहेत.

मा.गोडसे साहेब यांचे कोर्टात
अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७१७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०७/२०२२

१) श्री.कृष्णा धर्मा पाटील
वय : ६५ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा.मु.कासप, पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.मुक्ताबाई दत्तात्रय म्हात्रे
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.चावंढोळी, पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.ताराबाई जनार्दन मोरे
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दुश्मी, पो.खारपाडा, ता.पेण, जि.रायगड
४) सौ.गंगुबाई हनुमंत तुपे
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोहोपाडा, पो.रसायनी, ता.खालापूर, जि.रायगड
५) सौ.प्रतिमा परशुराम पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कांदळेपाडा, पो.कांदळेपाडा, ता.पेण, जि.रायगड अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.धर्मा काळु पाटील हे दि.०६/०७/१९९२ रोजी मरण पावले असून त्यांची पत्नी व अर्जदार नं.१ ते ५ ची आई रखमाबाई धर्मा पाटील ही अर्जदार लहान असतानाच मरण पावली आहे व ज्याअर्थी सदर मयत धर्मा काळु पाटील यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एमआयडीसी करिता ॲक्वीझिशन केस नं.LAQ/SR-1032-Panvel अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कराडे बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २६ | १/१ (P) | ०-२८-५ | २१,१२७ |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत धर्मा काळु पाटील यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत धर्मा काळु पाटील यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१२ माहे ०५ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

आरटीएस वि.मा.अर्ज क्र.७४/२०१८

प्रति,
कै.तुळाजी विठ्ठल पाटील तर्फे वारस
१) सुभाष तुळाजी पाटील
२) संतोष तुळाजी पाटीील
रा.चिलठण, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड
३) ताई तुळाजी पाटील
उर्फ ताई पंढरीनाथ पाटील
रा.माजगाव, आंबिवली, ता.खालापूर, जि.रायगड
४) सुरेखा तुळाजी पाटील
उर्फ सुरेखा तानाजी पाटील
रा.डोलवली, ता.खालापूर, जि.रायगड
५) मंगल तुळाजी पाटील
उर्फ मंगल किशोर पिंगळे
रा.घोडीवली, ता.खालापूर, जि.रायगड
६) आशा तुळाजी पाटील
उर्फ आशा दिपक लोंढे
रा.परळी, खरचोंडे, ता.सुधागड, जि.रायगड अपिलार्थी
विरुद्ध
१) कै.दत्ता भाऊ पाटील मयत तर्फे वारस
१/१) दर्शना दत्ता पाटील
रा.चिलठण, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड
२) काळुराम भाऊ पाटील
३) शंकर भाऊ पाटील
रा.चिलठण, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड
४) इंदू गजानन पाटील
रा.तोंडली, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड
५) सखु दत्ता तवळे
रा.वरोसेवाडी, ता.खालापूर, जि.रायगड
६) लिला चिंधू घरत
रा.टेंबररी, चौक, ता.खालापूर, जि.रायगड
७) दुर्गा हरिश्चंद्र महाडिक
रा.शिरढोणपाडा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
८) बळीराम विठ्ठल पाटील
रा.विठाई बिल्डींग विणानगर, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड
९) चंदर विठ्ठल पाटल
रा.मुकूंद हिल्स, ब्लॉक नं.७, वसंतराव देशमुख शाळेजवळ,
काटरंग, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड
१०) कै.नारायण महादू पाटील तर्फे वारस
१०/१) विठाबाई नारायण पाटील
रा.ताकई, पो.साजगाव, ता.खालापूर, जि.रायगड
११) कै.गणपत महादू पाटील तर्फे वारस
११/१) ताराबाई उर्फ कलम गणपत पाटील
११/२) कै.सुरेश गणपत पाटील तर्फे वारस
११/२/अ) हिरा सुरेश पाटील
रा.चिलठण, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड
११/२/ब) अरुणा दशरथ पाटील
११/२/क) अश्विनी अविन फराट
रा.घोडीवली, पो.ता.खालापूर, जि.रायगड
११/३) मनोहर गणपत पाटील
११/४) प्रमिला मोतीराम धारणे
११/५) रंजना साधुराम घारे
रा.खानाव, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड
१२) समीर एकनाथ पिंगळे
रा.काते मानिवली, कल्याण, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
१३) शरद गंगाराम रसाळ
रा.अंजरुण, ता.खालापूर, जि.रायगड
१४) नरेश काशिनाथ पाटील
रा.काटरंग, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड
१५) जनार्दन बापू हडप
रा.नावंढे, ता.खालापूर, जि.रायगड
१६) अविनाश रमेश खटणहार
रा.चिलठण, पो.डोणवत, ता.खालापूर, जि.रायगड सामनेवाले

वादी यांनी मौजे : चिलठण, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ४८४, ५९६, ६०७, ५९५ चे विरुद्ध दिनांक ०१/०८/२०१८ रोजी या कार्यालयात अपिल दाखल केले आहे. प्रस्तुतचे अपिल दाखल करणेस अर्जदार यांना विलंब झाला असल्याने अर्जदार यांनी विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज सोबत दाखल केला आहे.

सदर विलंब माफीचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.२७/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.१७/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले क्र.१, १२ व १६ यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे : चिलठण, ता.खालापूर, जि.रायगड | ५ | २० | ०-०३-५० | ०.०९ |
| | ५ | १६ | ०-०२-९०<br>०-००-२० | ०.०८ |
| | १० | २/अ/१ | ०-२८-८०<br>०-०१-६० | ६.८१ |
| | ४ | १४ | ०-१२-०० | ०.३० |
| | ४ | ११ ब | ०-४४-०० | ०.६२ |
| | १ | ७ | ०-३३-०० | ०.५५ |
| | ७ | १ | ०-२७-३० | ३.६२ |
| | १५ | ६ | ०-२७-९० | १.१२ |
| | १६ | ४ | ०-०४-३० | ०.०२ |
| | ३७ | ७/इ | ०-१७-७०<br>०-०४-५० | ०.८७ |
| | ३८ | ७ | ०-०३-३० | ०.०५ |
| | ३६ | ३ | ०-०३-५० | ०.०६ |
| | ३३ | २ | ०-०४-०० | ०.१७ |
| | २६ | ६ | ०-०५-०० | ०.१२ |
| | १४ | ९ | ०-२३-६०<br>०-००-८० | ०.४१ |
| | १० | २/अ/४ | ०-१०-०० | २.०० |
| | १० | २/अ/३ | ०-१३-३०<br>०-००-०७ | २.०० |
| | ५ | १३ | ०-०१-३० | ०.२५ |
| | ८ | ५ | ०-१०-००<br>०-००-८० | २.३६ |
| | १० | २/अ/२ | ०-१२-०० | २.०० |
| | ८ | १ | ०-२९-६०<br>०-०२-५० | ५.८७ |
| | ४ | ११ अ | ०-४३-०० | ०.६२ |
| | ५ | ११ | ०-२०-८० | ०.४५ |
| | ४ | ७ | ०-११-०० | ०.१९ |
| | १२ | ३ | ०-३५-४० | ७.१२ |
| | २७ | २ ई | ०-१६-२० | ०.२५ |
| | १२ | १ | ०-०४-५० | ०.९४ |
| | १२ | ४ | ०-३७-६० | ७.५० |
| | १२ | २ | ०-०५-१० | १.०० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १९/०४/२०२२

**सही/-
उपविभागीय अधिकारी
कर्जत उपविभाग कर्जतकरिता**

# संक्षिप्त...

## २६ वर्षाचा तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२० व्या मजल्यावरून पनवेल कोन येथील इंडिया बुल्सच्या इमारती वरून खाली पडून वैभव जैन (२६, रा राजस्थान) याचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून त्याने आत्महत्या केली की तो खाली पडला याचा शोध पनवेल तालुका पोलीस करत आहेत.

## महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खोकल्याचे औषध समजून त्रणनाशक विषारी औषध घेतल्याने पनवेल तालुक्यातील तूरमाळे येथील ४६ वर्षीय महिलेचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. तूरमाळे येथील सुवर्णा घनश्याम चोरघे यांनी सात मे रोजी खोकल्याचे औषध समजून विषारी औषध प्यायले. त्यांना पनवेल येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. १० मे रोजी त्यांचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. या घटनेची पनवेल शहर पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## ह.भ.प. तुकाराम घोसाळकर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील कुंभार आळी भागातील रहिवासी तसेच नागोठण्यातील वारकरी सांप्रदायाचे एक प्रमुख आधारस्तंभ ह.भ.प. तुकाराम पांडूरंग घोसाळकर यांचे बुधवार दिनांक ११ मे रोजी सकाळी ८.०० वाजता वयोवृद्धत्वाने निधन झाले. त्यांच्यावर के.एम.जी. विभाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यसंस्कारास नातेवाईक, समजाबांधव तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. तुकाराम घोसाळकर यांच्या पश्चात पत्नी, पुतण्या अमोल घोसाळकर, सुन, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. कै. तुकाराम घोसाळकर यांचे दशक्रिया विधी शुक्रवार दिनांक २० मे रोजी नागोठण्यातील शृंगार तलाव येथे तर उत्तरकार्य (बारावे) रविवार दिनांक २२ मे रोजी कुंभार आळी, नागोठणे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती घोसाळकर कुटुंबियांकडून देण्यात आली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# अखेर ई- रिक्षाचा लढा यशस्वी ; माथेरानमध्ये लवकरच ई-रिक्षा धावणार

## सुनील शिंदेंच्या प्रयत्नांना यश ; व्यापारी वर्गासह नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील दहा वर्षांपासून ई रिक्षासाठी अविरतपणे लढा देत आज दि.१२ मे रोजी सुप्रीम कोर्टाच्या निकालानुसार माथेरान मध्ये ई रिक्षा सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी ई रिक्षा श्रमिक संघटनेचे सचिव, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदेंनी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याने संपूर्ण माथेरान मधून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

जग एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना देखील माथेरान सारख्या या सुंदर स्थळावर ब्रिटिश काळापासून आजही इथे अमानुषपणे हातरीक्षाचा व्यवसाय सुरु आहे.या श्रमिकांना या अमानवीय प्रथेतून कायमस्वरूपी मुक्ती मिळावी त्याचप्रमाणे चार ते पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या शाळांमध्ये लहान लहान विद्यार्थ्यांना शाळेसाठी पायपीट करावी लागत आहे. इथे दळणवळणाची सुविधा नसल्याने इथली स्थानिक मंडळी महागाईच्या झळा सोसत खूपच हलाखीचे जीवन जगत आहेत हे कुठेतरी थांबले पाहिजे यासाठी सुनील शिंदेंनी मागील दहा वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला होता. ई रिक्षा सुरू करणे हे सर्वात मोठे आव्हान असताना देखील त्यांनी केवळ इथली भौगोलिक परिस्थिती बदलली पाहिजे. माणसाला माणसा सारखी वागणूक मिळाली पाहिजे.वाहतुकीची सोय नसल्याने इच्छा असून सुद्धा वयोवृद्ध पर्यटक येऊ शकत नाहीत याची खंत वाटत असल्यामुळे सुनील शिंदेंनी दहा वर्षे आपला लढा अविरतपणे सुरू ठेवला त्याला यश मिळाले असून लवकरच हे सुंदर स्थळ ई रिक्षाच्या माध्यमातून जगाच्या बरोबरीने धावणार आहे.

खरोखरच ही एक ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल. कारण इथे स्थानिकांना आजवर अनेक संकटांना तोंड द्यावे लागत होते. आम्ही पदभार स्वीकारल्यानंतर ई रिक्षाचा प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने विविध कार्यालयात जावे लागत होते. सुनील शिंदेंनी जी काही मेहनत घेतली आहे ती खरोखरच वाखाणण्याजोगी असून हे गाव आगामी काळात नक्कीच यशाच्या शिखरावर जाणार यात शंका नाही.

**सुरेखा भणगे, मुख्याधिकारी तथा प्रशासक माथेरान नगरपरिषद**

हातरिक्षा चालकांच्या दहा वर्षाच्या संघर्षाला अभूतपूर्व यश आले आहे माथेरान करांसाठी हा आजचा सोन्याचा दिवस आहे. अमानवीय प्रथेतून मुक्ती रिक्षा संघटनेच्या याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली न्यायाधीशांनी अशा प्रकारची व्यवस्था २१ व्या शतकात कशी सुरू राहू शकते असा जाब राज्य सरकारचे अटरणी जनरल वकील याना विचारला.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेश नुसार सनियंत्रण समितीला पायलट प्रोजेक्ट सुरू करायचा त्याला आज सुप्रीम कोर्टाने मान्यता दिली तीन महिन्यानंतर रिपोर्ट कोर्टाला सादर करायचा आहे माथेरानच्या जनतेचे आभार व अभिनंदन

**सुनिल शिंदे, सामाजिक कार्यकर्ते माथेरान**

खऱ्या अर्थाने अभूतपूर्व निर्णय दळण वळणातील व पर्यटन वाढीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय आहे. माणसाकडे चिकाटी असली की काय होते. हे पाहायला मिळाले. वेळ, पैसा, प्रसंगी विरोध आपल्या घरातील मधल्या काळातील आजारपण या सगळ्या गोष्टीवर आपण मात केली. आपणास ई रिक्षाचे जनक म्हंटले तर वावगे ठरणार नाही माथेरानकर आपले योगदान कधीच विसरणार नाही याची इतिहासात आपली नोंद राहील.

**शिवाजी शिंदे, माजी विरोधी पक्षनेते काँग्रेस**

# अंमली पदार्थ विरोधी दाखल असलेल्या गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला मुद्देमाल नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील पेण, खालापूर, पाली, नागोठणे, खोपोली या ५ पोलीस ठाण्यात ७ गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला एकेचाळीस लाख, बावन्न हजार, चारशे चौतीस रुपये कीमतीचा १३१ किलो ३३० ग्रॅम वजनाचा गांजा या अंमली पदार्थाची एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ५२ अ (२) प्रमाणे कार्यवाही करून मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा, एम.आय.डी.सी या ठिकाणी योग्य कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून नाश करण्यात आला. यावेळी अशोक दुधे, पोलीस अधीक्षक, अतुल झेंडे, अपर पोलीस अधीक्षक जगदीश काकडे, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय, दयानंद गावडे, पोलीस निरीक्षक यांच्यासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अधिकारी व वैद्यमापन शास्त्र अलिबाग व दोन शासकीय पंच उपस्थित होते.



वरील प्रक्रिया पुर्ण करणेकामी अशोक दुधे, पोलीस अधीक्षक, रायगड अलिबाग,.अतुल झेंडे, अपर पोलीस अधीक्षक, रायगड अलिबाग, जगदीश काकडे, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय (गृह), रायगड अलिबाग, यांचे मार्गदर्शनाखाली दयानंद गावडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड अलिबाग, परेश विलास म्हात्रे, अंमली पदार्थ विरोधी पथक, तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील अधिकारी/अंमलदार यांनी मदत केली.

# डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत भव्य रक्तदान शिबिर ; ९०० दास्त भक्तांनी केले रक्तदान

**दै.रायगड नगरी । उरण**

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित असणारे आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत जेएनपीटी वसाहत मधील मल्टिपर्पज सभागृहा मध्ये गुरुवारी ( दि१२) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या रक्तदान शिबिरामध्ये ९०० हुन अधिक दास्य भक्त रक्त दात्यानी आपले मोलाचे रक्तदान केले आहे. या शिबिरामध्ये तीन रक्त पेढ्या नी आपली टीम तैनात केली आहे. जेजे महानगर ब्लड बँक, जिल्हा रुग्णालयात अलिबाग रक्त केंद्र, डी वाय पाटील रक्त पेढी डॉ नानासाहेब प्रतिष्ठाण मार्फत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उदघाटन जेएनपीटीचे मुख्य प्रबंधक जयवंत ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, ब्ल्यू स्टार सिक्युरिटी चे संचालक विकास भोईर, पंचायत समिती सदस्य दीपक ठाकूर, जेएनपीटीच्या अधिकारी मनीषा जाधव, डॉ राज हिंगोराणी, जेजे महानगर ब्लड बँक पीआरओ अजय, डी वाय पाटील ब्लड बँकेचे, प्रसाद कुलकर्णी, हेगडे मॅडम, जिल्हा रुग्णालयात अलिबाग रक्त केंद्रचे डॉ श्रेयस पाटील, श्री सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

आज सर्वत्र रक्ताची गरज भासत आहे अनेकांनी रक्त न मिळाल्याने आपले प्राण गमावले आहे.त्यामुळे भासत असलेली रक्ताची गरज दूर करण्यासाठी पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्ताने डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या मार्फत रक्तदान शिबिर संपन्न झाले. या आगोदर ही डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत भव्य रक्तदान शिबिर आरोग्य शिबीर, स्वच्छता मोहीम वृक्ष लागवड वृक्ष संवर्धन मोहीम राबविण्यात आली आहे. शिबिरामध्ये रक्तदान करण्यासाठी दास्य भक्तांनी सकाळ पासूनच शिस्त बद्ध पद्धतीने आपला सहभाग घेतला होता.

## कामोठे वसाहतीत महिला असुरक्षित ; दोन दिवसात दोन घटना घडल्या

# पायी चालत जाणाऱ्या एका महिलेची बॅग, तर दुसऱ्या महिलेची चैन हिसकावली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीतील ३३ वर्षीय महिला रस्त्याने पायी आपल्या घरी जात असताना पाठीमागून आलेल्या चोरटयांनी त्या महिलेची हातामधे असलेली बॅग हिसकावल्याची घटना कामोठे वसाहतीत घडली आहे. तर दुसऱ्याच दिवशी एका महिलेच्या गळ्यातील चैन व लॉकेट चोरून नेले आहे. मात्र कामोठेमधे बतावणी, फसवणूक व सोनसाखळीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असल्याने नागरिक असुरक्षित असल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत.

सेक्टर २२ येथील नीलकंठ ग्रीन येथे राहणारी ३३ वर्षीय महिला आपल्या परिवारासह कामोठे वसाहतीत राहत आहे. त्या महिलेचे सेक्टर २१ येथे फॅमिली सलून पार्लर आहे. यावेळी नेहमीप्रमाणे आपला पार्लर बंद करून आपल्या घराकडे निघाल्या होत्या. त्या महिलेला रस्त्यामध्ये टीजेएसबी बँकेचे एटीएम दिसले, व त्या एटीएममध्ये पैसे टाकण्यासाठी गेल्या होत्या, त्यानंतर पुन्हा बाहेर येत पायी घराकडे जात असतानाच खांद्यावर ठेवलेली पर्स बॅग सेक्टर २२ येथील शिवनेरी सोसायटीजवळ आले असता पाठीमागून आलेल्या दोघेजण बाईकस्वार अज्ञात व्यक्तींनी जबरी चोरीच्या बेताने त्या महिलेचं गळ्यातील बॅग हिस्कावाली व नौपाडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याकडे पसार झाले.

यावेळी त्या बॅगमध्ये मोबाईल फोन, सोन्याची साखळी, अंगठी, व इतर दागिने असे एकूण ५४ हजार रुपये किमतीचे ऐवज चोरी झाल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. काही दिवसापूर्वी अशा अनेक घटना कामोठे वसाहतीत घडल्या आहेत. त्यामुळे येथील नागरिकांसह महिला असुरक्षित असल्याच्या प्रतिक्रिया कामोठेकर देत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत ८७,५००/-रु. किमतीची एक सोन्याची चैन चोरली. कामोठेतील सेक्टर १८ येथे राहणारी ५४ वर्षीय महिला रोज सकाळी पायी चालत जात असे हि महिला नेहमीप्रमाणे भुमीरत्न को. ऑ. सोसायटी या बिल्डिंगबाहेर रस्त्यावर चालत जात असताना पाठीमागून अज्ञात दोन बाईकस्वार यांनी रस्त्यावर चालणाऱ्या महिलेच्या गाळायत असलेली ८७,५००/-रु. किमतीची सोन्याची चैन व त्याला असलेला लॉकेट जबरदस्तीने घेचून घेऊन मानसरोवर रेल्वे स्टेशनकडे पसार झाले असल्याची घटना घडली आहे.

# पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां.२२२१/१८११/२०२२ — दिनांक : १२/०५/२०२२

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका/गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १ | मालमत्ता क्र.३३८ अ, पनवेल | पांडुरंग गणपत तेरडे | बाळाराम पांडुरंग तेरडे, बाळकृष्ण पांडुरंग तेरडे, प्रभाकर पांडुरंग तेरडे, अनिल पांडुरंग तेरडे, अरुण पांडुरंग तेरडे, उषा हरीष तेरडे, शितल सचिन चंदने उर्फ शितल हरिष तेरडे, तृप्ती रोहित आठवणे उर्फ तृप्ती हरिष तेरडे |
| २ | ६ | सिटी एस क्र.६६६-१-A व इतर, सदनिका क्र.सी-२०१, सोहम सोसा., पनवेल | अमोल मुरलीधर वेल्हाळ<br>स्नेहल अमोल वेल्हाळ | चेतन रवींद्र कदम,<br>रवींद्रनाथ शांताराम कदम |
| ३ | ६ | सिटी एस क्र.५९७-बी, ५९७-सी, सदनिका क्र.एफ.आर-४, बी विंग, श्री लक्ष्मी सोसा., पनवेल | शरद यशवंत दातार | पुष्पक अरुण लिमये<br>स्नेहल पुष्कर लिमये |
| ४ | ९ | फा.प्लॉट नं.४५८, ४९७, ४९८, सदनिका क्र.बी-४१, कल्पतरु रिव्हरसाईड, तक्का, पनवेल | मे.कल्पतरु शरियन्स<br>प्रेरणा हिरदेश गुप्ता तर्फे कु.मु.वीरेन कुमार गुप्ता, हिरदेश कुमार गुप्ता तर्फे कु.मु.वीरने कुमार गुप्ता | सुजाता संदीप पाटील<br>संदीप जयवंत पाटल |
| ५ | १४ | फा.प्लॉट नं.क्र.२९/८, सदनिका क्र. सी-१०१, निलकंठ गार्डन सोसा.पनवेल | मोन्द्रेती सत्यनारायण राव,<br>मोन्द्रेती सुभाषिनी | जिग्ना सुरेश मल,<br>सुरेश मोहनलाल मल |
| ६ | १४ | फा.प्लॉट नं.५२२/१, सदनिका क्र.३०१ गॅलेक्सी अव्हेन्यु, ५२ बंगला, पनवेल | संतोष नामदेव फडके | श्वेता संतोष फडके |
| ७ | ६ | सिटी एस क्र.७३७ ए, गाळा क्र.०५, रंभा निवास, पनवेल | सीमा सचिन जैन | उषा श्रीकांत सोनी |
| ८ | ६ | सिटी एस क्र.७३७ ए, गाळा क्र.०६, रंभा निवास, पनवेल | सीमा सचिन जैन | उषा श्रीकांत सोनी |
| ९ | ६ | सिटी एस क्र.७३७ ए, गाळा क्र.०९, रंभा निवास, पनवेल | सीमा सचिन जैन | उषा श्रीकांत सोनी |
| १० | ५ | प्रॉपर्टी क्र.७६७ ए/१, ७६७ ए ३/१, ७३७/बी, गोडावून क्र.५, शुभ लाभ सोसा.पनवेल | नीतू गगनदार परमाणी | उषा श्रीकांत सोनी |
| ११ | ५ | प्रॉपर्टी क्र.७६७ ए/१, ७६७ ए ३/१, ७३७/बी, गोडावून क्र.४, शुभ लाभ सोसा.पनवेल | नीतू गगनदार परमाणी | उषा श्रीकांत सोनी |
| १२ | १५ | फा.प्लॉट क्र.२४७, गाळा क्र.७२, शॉपिंग सेंटर, पनवेल | मोवन शांतीलाल सोलंकी<br>दाडमी हिरालाल सोलंकी | दाडमी हिरालाल सोलंकी |
| १३ | १६ | प्लॉट क्र.४४८, ४४९, सदनिका क्र. ३०२, मोराज रेसिडेन्सी, पनवेल | भालचंद्र एस राणे, सरला बी राणे<br>पुजा राजेश कदम<br>सिद्धेश अशोक पाथरे<br>सानवी सिद्धेश पाथरे | अक्काताई मानसिंग खामकर |
| १४ | ४ | फा.प्लॉट क्र.२८, गाळा क्र.०१, मिडल क्लास सोसा, पनवेल | मंगला मोरेश्वर पोतदार | संजय मोरेश्वर पोतदार |
| १५ | ४ | फा.प्लॉट क्र.२०६, सदनिका क्र.२०२, मोरेश्वर निवास सोसा., पनवेल | शेख अली | मीना संजय पोतदार |
| १६ | ४ | फा.प्लॉट क्र.२०६/१२ सदनिका बी-५, मोरेश्वर निवास सोसा., पनवेल | परेश चिंतामण भिडे | मीना संजय पोतदार |
| १७ | १२ | फा.प्लॉट क्र.१२५ ए-७, गाळा क्र.सी-३५, नंदनवन कॉम्प्लेक्स, पनवेल | शिरिन सदरुद्दीन विराणी,<br>सलीम सदरुद्दीन विराणी | गुरुमिसिंग कोहली<br>इंद्रजितकौर कोहली |
| १८ | १४ | फा.प्लॉट क्र.५२१, ५२१/२, सदनिका क्र.ए-१४, जय नगर सोसा, पनवेल | अण्णासाहेब शामराव लोंढे<br>लता अण्णासाहेब लोंढे | उदयकांत हरीराम बारु<br>ज्योती उदयकांत बारु |
| १९ | १२ | फा.प्लॉट क्र.१२९, सदनिका क्र.सी-२०१, यशोपुरम-वसंत सोसा, पनवेल | जयश्री भालंचद्र ओक | संपदा सुहास जोशी<br>सुहास श्रीधर जोशी |
| २० | १० | सिटी एस क्र.१२७९ व इतर, सदनिका क्र.३०४, मंगल कलश अपार्टमेंट, पनवेल | जयंत नागू दिघे | अनिता जयंत दिघे |
| २१ | op-९९ | सिटी सर्व्हे क्र.७७६/१, १-स्टोअर रुम, टपाल नाका, एम.जी.रोड, पनवेल | पन्नालाल के.बांठीया<br>मोतीलाल के.बांठीया | सुनील पन्नालाल बांठीया |
| २२ | op-९९ | सिटी सर्व्हे क्र.७७६/१, दुकान/सदनिका क्र.१, टपाल नाका, एम.जी.रोड, पनवेल | पन्नालाल के.बांठीया<br>मोतीलाल के.बांठीया | सुनील पन्नालाल बांठीया |
| २३ | op-९९ | सिटी सर्व्हे क्र.७७६/१, २-स्टोअर रुम, टपाल नाका, एम.जी.रोड, पनवेल | पन्नालाल के.बांठीया<br>मोतीलाल के.बांठीया | सुनील पन्नालाल बांठीया |
| २४ | २ | ७७६, ७७७/१-२-३, एम.जी.रोड, पनवेल | पन्नालाल के.बांठीया<br>मोतीलाल के.बांठीया | सुनील पन्नालाल बांठीया |
| २५ | ३ | ७७६, ७७७/१-२-३, दुकान क्र.१, एम.जी.रोड, पनवेल | पन्नालाल के.बांठीया<br>मोतीलाल के.बांठीया | सुनील पन्नालाल बांठीया |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी

**सही/-**
**(सुनिल मानकामे)**
**सहा.आयुक्त**
**मालमत्ता कर विाग**
**पनवेल महानगरपालिका**